अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३३३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


## गादेगावात छोटा हत्तीखाली सापडून दीड वर्षाच्या बालिकेचा मृत्यू

सुराज्य/पंढरपूर

गादेगाव तालुका पंढरपूर येथे छोटा हत्ती वाहनाच्या चाकाखाली सापडून दीड वर्षाची मुलगी गंभीर जखमी होऊन मयत झाली. हा अपघात मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडला.

प्रगती अमोल बागल (वय दीड वर्षे रा. गादेगाव) असे मयत झालेल्या मुलीचे नाव आहे. यासंदर्भात मुलीचे चुलते सुशील बागल यांनी पंढरपूर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी एम एच१०-डीटी-२५८८ २५ ८८ या छोटा हत्तीचा चालक राहुल नानासाहेब साळुंखे (रा.गादेगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

बागल यांच्या शेतातील डाळिंब काढणीचे काम चालू आहे. डाळींबाचे कॅरेट नेण्यासाठी छोटा हत्ती शेतात आला होता. घरापाठीमागीत कच्च्या रस्तावरून टेंपो जाताना प्रगती ही डाव्या बाजूच्या चाकाखाली सापडून मयत झाली. अशी नोंद पोलिसात झाली. फौजदार दिवसे पुढील तपास करीत आहेत.

# व्हू इज द 'बॉस'!  ओन्ली फडणवीस

# सरकारी बाबूंची होतेय 'कासावीस'

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्यातील महायुतीच्या सरकारमध्ये मोठी गडबड असल्याचे दिसत आहे. सत्तेत तीन पक्ष असल्याने त्यांचा सत्तेत वरचढपणा सुरू झाला आहे. एकमेकांचे पाय ओढणे,एकमेकांना शह देणे,एकमेकांचे निर्णय हाणून पाडण्याचे कारस्थान सुरू असल्याचे पहायला मिळते. सत्तेचा प्रमुख कोण? ऐकायचे कोणाचे? हा गंभीर प्रश्न सरकारी बाबूंपुढे उभा आहे. त्यामुळे सरकारचा खरा 'बॉस' कोण?(व्हू इज द बॉस..) असा प्रश्न मंत्रालयात विचारला जावू लागला आहे.मुख्य सचिवांकडून एक नवा फतवा निघाल्यामुळे सत्तेचे खरे बॉस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस(ओन्ली फडणवीस) हेच असल्याचे सिद्ध झाले आहे. प्रत्येक महत्त्वाची फाईल फडणवीस यांच्या मंजुरीशिवाय शिंदे यांच्याकडे जाणारच नाही, असे आदेश मुख्य सचिवांनी काढल्याने सरकारवर फडणवीसांचे पूर्ण नियंत्रण प्रस्थापित झाले आहे. या नवीन आदेशामुळे सरकारी कामकाज नियमावलीचा भंग होत असल्याचे विचारवंत सांगतात पण सत्तेपुढे शहाणपण चालत नाही.पुराणातील वांगी पुराणातच ठेवा,असा सत्ताधीशांचा खाक्या असतो.**



## शिंदे-देवेंद्र एक झाले, दादा एकटे पडले

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे माझे 'बॉस' आहेत, असे फडणवीस यांनी गेल्या वर्षभरात अनेकदा सांगितले असले तरी त्यांनी आता सरकारवरील आपली पकड अधिक मजबूत केली आहे. प्रत्येक महत्त्वाची फाईल फडणवीस यांच्या मंजुरीशिवाय शिंदे यांच्याकडे जाणारच नाही, असे आदेश मुख्य सचिवांनी काढल्याने सरकारवर फडणवीसांचे पूर्ण नियंत्रण प्रस्थापित झाले आहे. मात्र, त्यातून प्रचलित कामकाज नियमावलीचा (रुल्स ऑफ बिझिनेस) भंग होत असल्याची चर्चा मंत्रालयीन वर्तुळात सुरू झाली आहे.

राज्यघटनेतील तरतुदीनुसार उपमुख्यमंत्री पदाला मुख्यमंत्र्यांप्रमाणे कोणतेही विशेष अधिकार नाहीत, मुख्यमंत्री हे सरकारचे घटनात्मक प्रमुख आहेत. उपमुख्यमंत्री हे त्यांच्याकडील खात्यांचे केवळ कॅबिनेट मंत्री असतात. उपमुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून पर्यायी सत्ताकेंद्रे तयार होऊ नयेत, यासाठी शिवसेनेला उपमुख्यमंत्रीपद देणार नाही, अशी भाजपची भूमिका २०१४-१९ या फडणवीस यांच्या सरकारच्या कार्यकाळात होती. मात्र भाजपने उत्तरप्रदेशसह अनेक राज्यांत उपमुख्यमंत्री नेमले होते. महाराष्ट्रात शिंदे यांना मुख्यमंत्रीपद दिले, तरी फडणवीस यांना उपमुख्यमंत्री करून त्याआडून भाजपने सरकारवर नियंत्रण ठेवण्याच्या अनेक तरतुदी केल्या होत्या. फडणवीस यांचे विश्वासू अधिकारी मुख्यमंत्री कार्यालयातही नेमण्यात आले होते.

मात्र अजित पवार उपमुख्यमंत्री झाल्यावर आणखी एक नवीन सत्ताकेंद्र तयार झाले. त्यांनी मंत्रालयात पर्यायी वॉर रूम, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका आणि पुण्यात चंद्रकांत पाटील पालकमंत्री असताना तेथील कारभारातही हस्तक्षेप सुरू केला.पवार यांच्याकडून अनेक फाईल्स मुख्यमंत्र्यांकडे केवळ सहीसाठी जाऊ लागल्या. त्याचा फटका भाजप व शिंदे गटालाही बसू लागला. त्यामुळे कर व अर्थविषयक बाबी, विधिमंडळात सादर करायची विधेयके यासह महत्त्वाच्या बाबींच्या फाईल्स थेट मुख्यमंत्र्यांकडे केवळ सहीसाठी न जाता फडणवीस यांच्या मान्यतेसाठी पाठविण्याचे आदेश काढले गेले. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार मुख्य सचिवांनी आदेश काढले असले तरी गेली वर्षानुवर्षे असलेल्या प्रचलित कामकाज नियमावलीनुसार (रुल्स ऑफ बिझिनेस) उपमुख्यमंत्र्यांकडे प्रत्येक महत्त्वाची फाईल पाठविण्याची तरतूद नाही. सचिव हा प्रशासनाचा प्रमुख असून संबंधित खात्याचा प्रमुख मंत्री असतो. त्यांच्या मान्यतेने कोणतीही फाईल मुख्यमंत्र्यांच्या किंवा गरजेनुसार प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी पाठविला जातो.

मुख्यमंत्र्यांना नियम बदलण्याचे अधिकार असले तरी फडणवीस यांच्याकडे उपमुख्यमंत्री म्हणून महत्त्वाची फाईल जाऊ लागल्यास नवीन पायंडा पडणार आहे. राजकीय कुरघोड्यांसाठी प्रशासकीय घडी विस्कटणार आहे. त्यामुळे सरकारमधील खरे बॉस शिंदे की फडणवीस अशी चर्चा मंत्रालय पातळीवर सुरू झाली आहे.

**पंख छाटले :** 'शासन कार्यनियमावलीच्या दुसऱ्या अनुसूचित निर्दिष्ट केलेली सर्व प्रकरणे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री (अजित पवार) यांच्यानंतर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री (देवेंद्र फडणवीस) यांच्यामार्फत मुख्यमंत्री महोदयांना सादर करण्यात यावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत', असा आदेश मुख्य सचिवांनी काढल्याने अजित पवार यांच्याकडून फाईल थेट मुख्यमंत्र्यांकडे न जाता फडणवीस यांच्या माध्यमातून जाणार आहे. हा एक प्रकारे अजितदादांचे पंख छाटण्याचाच प्रयत्न असल्याची कुजबुज मंत्रालयाच्या वर्तुळात सुरू झाली आहे.

**मुख्यमंत्र्यांचाच लगाम :** अजित पवार यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्यापासून शिंदे गट तसेच भाजपमध्ये अस्वस्थता होती. त्यातच अजित पवार यांनी गेल्या काही दिवसांत बैठका आणि निर्णयांचा धडाका लावताना मुख्यमंत्री आणि भाजप नेत्यांची नाराजी ओढवून घेतली होती. त्यामुळे पवार यांच्या कारभाराला लगाम लावण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला असून यापुढे आपल्याकडे येणाऱ्या सर्व महत्त्वाच्या तसेच प्रसंगी वित्त विभागाने नाकारलेल्या फाईल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्फत आपल्याकडे पाठवाव्यात, असे आदेश शिंदे यांनी प्रशासनास दिले आहेत.

## मिरवणुकीत नाचण्याच्या कारणावरून मारहाण

सुराज्य/सोलापूर



मिरवणुकी नाचण्याच्या तसेच भांडण सोडविण्याच्या कारणावरून लाथाबुक्क्या आणि बेल्टने झालेल्या मारहाणीत ५ जण जखमी झाले. ही घटना सिव्हील हॉस्पिटल परिसरातील ग्रामीण पेट्रोल पंपाजवळ बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली .

कल्याण किसन मुदगल (वय १८), नागेश शंकर जाधव (वय २२), धीरज अंबादास बंदपट्टे (वय २५) आणि गणेश यल्लाप्पा मंठाळकर (वय२२ सर्व रा.रविवार पेठ) अशी पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. काल रात्री ८ वाजेच्या सुमारास रथोत्सव मिरवणूक पोटफाडी चौकातील ग्रामीण पेट्रोल पंपाजवळ आली होती. त्यावेळी डान्स कारणावरून तक्रार चालू होती. वरिल चौघेजण भांडण सोडवण्यात गेले असता त्यांना अनोळखी १० ते १५ लोकांनी लाथाबुक्क्या आणि जडवस्तुने मारहाण केली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली .

तर या पूर्वी बीजेपी कार्यालयाजवळ मिरवणुक आली असता डान्स करण्याच्या कारणावरून बेल्ट आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत सुरज बाळासाहेब कदम (वय २२ रा.आंबेडकर नगर) हा जखमी झाला. त्याला धीरज बंदपट्टे, महेश सल्ला आणि इतर ६ जणांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

## अडीच तोळे सोन्याचे लॉकेट पळवले

सुराज्य/पंढरपूर

रक्षाबंधन साठी बहिणीकडे निघालेल्या भावाच्या गळ्यातील अडीच तोळे सोन्याचे लॉकेट अज्ञात चोरट्याने काढून घेतल्याची घटना पंढरपूर बसस्थानकात घडली.

याप्रकरणी येथील जिल्हा हिवताप कार्यालयातील कर्मचारी संजय दत्तात्रय देशमुख यांनी गुन्हा दाखल केला आहे. संजय देशमुख हे बुधवार ३० रोजी रक्षाबंधन असल्यामुळे बार्शी येथे आपल्या बहिणीकडे जाण्यासाठी पंढरपूर बसस्थानकामध्ये आले होते.

यावेळी पंढरपूर ते अमरावती या बस मध्ये बसत असताना त्यांची पिशवी कोणत्यातरी वस्तूला अडकल्यामुळे त्यांनी खाली वाकून पाहिले व आपली पिशवी काढून घेतली. याचाच फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अडीच तोळे सोन्याचे लॉकेट काढून घेतले. बस मध्ये बसल्यावर सदर बाब त्यांच्या लक्षात आली.

या प्रकरणी त्यांनी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## पार्लमेंटचे विशेष अधिवेशन; लोकसभा निवडणुकीची नांदी

सुराज्य/नवी दिल्ली



आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशातील राजकारण तापू लागले आहे. दरम्यान मोदींविरोधात विरोधकांनी २८ पक्षांची मोट बांधत भाजपाला टक्कर देणारी इंडिया आघाडी उघडली आहे. याच इंडियाची बैठक मुंबईत सुरू असून, विविध विषयांवर चर्चा रंगू लागली आहे. या सर्व उलथापालथीमध्ये गुरुवारी दुपारी केंद्रीय संसदमंत्री प्रल्हाद जोशी यांनी ट्विट करत संसदेचे विशेष अधिवेशन १८ ते २२ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आल्याची माहिती दिली आहे.

तेव्हा हे विशेष अधिवेशन म्हणजे पुढील लोकसभा निवडणुका वेळेआधीच घेतल्या तर जाणार नाही ना अशीही चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. नरेंद्र मोदी यांच्याविरोधात देशातील तब्बल २८ पक्षांनी एकत्र येत इंडिया आघाडी उघडली आहे. या इंडिया आघाडीची तिसरी बैठक सध्या मुंबईत सुरू आहे. दरम्यान या बैठकीच्या पहिल्याच दिवशी तिकडे दिल्लीतून एक नवी घोषणा झाली आहे. संसदेचे केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ट्विट करत यांनी पुढील म्हणजेच सप्टेंबर महिन्यात चार दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आता केंद्र सरकार आपले उरलेले कामकाज लवकरच आटोपून तर घेत नाही ना असाही प्रश्न यानिमित्ताने विरोधकांकडून विचारला जात आहे..

काही दिवसांपूर्वीच विरोधकांकडून असे दावे करण्यात आले होते की, यावेळी मोदी सरकार सार्वत्रिक निवडणुका वेळेआधी घेऊ शकतात. केंद्रातील मोदी सरकार जानेवारी-फेब्रुवारीमध्ये लोकसभा निवडणुका घेऊ शकते, अशी दिल्लीच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. त्याचवेळी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यानंतर आता बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे नुकतेच विधान या चर्चेला बळ देणारे आहे. ममता बॅनर्जी आणि नितीश कुमार यांनी म्हटले आहे की, हे लोक लोकसभेच्या निवडणुका वेळेआधीच घेऊ शकतात अशा वक्तव्यानंतर आता करण्यात आलेल्या घोषणेचा सहसंबंध जोडल्यास विरोकांच्या त्या शक्यता खऱ्या ठरण्याची शक्यता आहे.

**तर्क-वितर्क :** एनडीए पक्षाच्या खासदारांनी दिल्लीमध्येच उपस्थित राहावे, दिल्ली सोडून जाऊ नये अशा सक्त सूचना भाजपने दिल्या आहेत. त्यामुळे संसदेत कोणते महत्त्वाचे विधेयक पारित केले जाणार आहे याबद्दल तर्क वितर्क लावण्यात येत आहेत. त्यामध्ये समान नागरी कायदा, एक देश एक निवडणूक किंवा भाजपच्या अजेंड्यावरील एखादं महत्त्वाचं विधेयक पटलावर मांडण्यात येणार असल्याच्या दबक्या आवाजात चर्चा आहेत.

## शेवटच्या दिवशी तब्बल सवा पाच कोटींची वसुली

### सर्व्हर स्लो असल्यामुळे नागरीक हैराण

सुराज्य/सोलापूर

थकित मिळकत कर भरण्याचा गुरुवारी शेवटचा दिवस असल्याने शहरातील मिळकत कर थकीत असणाऱ्या नागरिकांनी कर भरण्यासाठी हुतात्मा स्मृती मंदिर येथे एकच गर्दी केली होती. गुरुवारी दिवसभरात तब्बल सव्वा ५ कोटींची वसुली झाली. रात्री उशिरापर्यंत नागरिक कर भरण्यासाठी रांगेत उभे होते.

सोलापूर महानगरपालिकेतर्फे शहरातील मिळकत कर थकबाकी असणाऱ्या मिळकतदारांना ३१ ऑगस्ट या शेवटच्या दिवशी थकबाकी भरून होणारी संभाव्य जप्तीचे कारवाई टाळण्याचे आवाहन सातत्याने करण्यात आले होते. याला सोलापूरकरांनी चांगला प्रतिसाद देत गुरुवारी हुतात्मा स्मृती मंदिर येथे मिळकत कर थकबाकी भरण्यासाठी रांगा



लावल्याचे निदर्शनास आले. सकाळी कार्यालयीन वेळेत सुरू झालेले थकबाकी मिळकत कर भरणा केंद्र रात्री ९ वाजले तरीही सुरू होते. गुरुवारी रात्री ९ वाजेपर्यंत जवळपास ५ कोटी २५ लाखांची थकबाकी वसुली झाली होती. दुपारच्या वेळेत सर्व्हर स्लो झाल्याने बऱ्याच मिळकतदारांना ताटकळत उभे राहावे लागल्याने त्यांच्यात व महानगरपालिका कर्मचाऱ्यांमध्ये जोरदार शाब्दिक बाचाबाची झाली.

बहुतांश मिळकतदारांनी अभय योजना पुन्हा लागू होईल या आशेने आपली थकबाकी भरणा केली नव्हती. परंतु अभय योजना पुन्हा लागू न झाल्याने नाईलाजाने गुरुवारी शेवटच्या दिवशी सर्व थकबाकीदारांनी महानगरपालिकेच्या भरणा केंद्रांमध्ये कर भरण्यासाठी गर्दी केली होती. चालू वर्षात केवळ ८५ कोटीच कर भरणा झाला आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




जहाँ 'दाळ-दाळ' पे सोने की चिडिया करती है बसेरा...

| कल्याण |
| --- |
| 128-12-246 |

| मुंबई |
| --- |
| 116-81-146 |

## जिल्ह्यासाठी डाळिंब-द्राक्ष क्लस्टरला २४७ कोटी मंजूर

सुराज्य/सोलापूर

**केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने फलोत्पादन समूह विकास योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यासाठी डाळिंब आणि द्राक्ष क्लस्टर साठी २४७ कोटी रूपये निधी मंजूर केला आहे. चार वर्षांत डाळिंब क्लस्टर उभारले जाणार आहे.**

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात उत्पादित होणाऱ्या डाळींब उत्पादक शेतकऱ्यांनी जागतिक बाजारपेठ काबीज केली आहे. डाळिंबामुळे सोलापूरचे नावही आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले. आज डाळिंब उत्पादक शेतकरी वेगवेगळ्या समस्यांमुळे त्रस्त आहे. तेल्या रोगाचे संशोधन होऊन त्याचे पूर्णतः उच्चाटन होताना दिसत नाही. प्रतिकूल परिस्थितीत डाळिंब उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या या योजनेमुळे नवी ऊर्जा मिळेल. सोलापूर डाळिंब क्लस्टरला जागतिकस्तरावर स्पर्धात्मक बनविण्यासाठी पूर्व उत्पादन, काढणीनंतरचे व्यवस्थापन व मूल्यवर्धन, विपणन आणि ब्रेंडिंग यासह संपूर्ण मूल्यशृंखलेच्या विकासाचा समावेश केला आहे. सोलापूर डाळिंब क्लस्टरसाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून मे. बी. व्ही. जी.



ग्लोबल फार्म वर्क्स लि. सोलापूर या संस्थेस मान्यता दिली आहे.

डाळिंब क्लस्टरचा आराखडा २४७ कोटी रुपयांचा • असून, नर्सरी, टिशू कल्चर २ प्रयोगशाळा याचा समावेश आहे.

या प्रकल्पांतर्गत प्रामुख्याने आधुनिक ६ हेक्टर क्षेत्रावरील जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन, २० हजार हेक्टर क्षेत्रावर एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, २० हजार हेक्टर क्षेत्रावर एकात्मिक कीड व्यवस्थापन, १२ हजार ९०० हेक्टर क्षेत्रावर प्लास्टिक अच्छादन, २० हजार हेक्टर क्षेत्रावरील फळपिकांचे ग्लोबल गॅप सर्टिफिकेशन, पाच हजार मेट्रिक टनाची २ शीतगृहे, पूर्व शीतकरणगृहे फिरती पूर्व शीतकरणगृहे २८ तसेच एकात्मिक प्रक्रिया आणि मूल्यवर्धन २ केंद्रे, टर्मिनल मार्केट हे घटक राबविण्यात येणार आहेत. या डाळिंब प्रकल्पामुळे २० हजार हेक्टर क्षेत्रावरील ३० हजार शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

## सासऱ्याच्या जाचास कंटाळून विवाहितेने विष पिले

सुराज्य/पंढरपूर

सवत व चुलत सासऱ्याने उसने दिलेल्या पैशासाठी मारहाण करण्याची धमकी दिल्यामुळे विवाहितेने शहर पोलीस ठाण्याच्या बाहेरच विष पिले.

शिवगंगा आप्पा काळे (वय-३३ रा. जोगदंड महाराज मठ ) असे त्या विवाहितेचे नाव आहे. शहर पोलीस ठाण्याच्या बाहेरील फुटपातवरच शिवगंगा हिने औषध पिले होते. यावेळी येथे हजर असलेले पोलीस कर्मचारी गजानन पाटील यांनी तातडीने रुग्णवाहिका बोलावून तिला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केल्यामुळे सदर महिलेचे प्राण वाचले.

पंढरपूर तालुक्यातील करकंब येथील आप्पा रघुनाथ काळे यांनी आपली पहिली बायको व चुलता अरुण पवार यांच्याकडून ६० हजार रुपये हात उसने घेतले होते. सदर पैसे आप्पा व शिवगंगा काळे यांनी वापस देखील केले होते. मात्र यानंतरही हे दोघे वारंवार त्यांच्याकडे पैशाची मागणी करत होते. पैसे न दिल्यास मारहाण करण्याची धमकी दिली जात होती. चुलत सासरे व सवतीकडून वारंवार देण्यात येणाऱ्या त्रासामुळे शिवगंगा काळे हिने नैराश्यपोटी विषारी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला.